**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १/२०२३**

लक्ष्मी उर्फ गंगा गजानन मुधोळकर वगैरे
विरुध्द
गजानन ज्ञानबा मुधोळकर

**निशाणी क्रमांक १४ वरील आदेश**

अर्जदार क्र. १ लक्ष्मी उर्फ गंगा यांनी स्वतःकरिता, मुलगी अर्जदार क्र. २ प्रियंका व मुलगा अर्जदार क्र. ३ वैभव यास सामनेवाला पती गजानन यांनी अर्जदार क्र. १ ते ३ करिता प्रत्येकी दरमहा रुपये ३,०००/– अंतरीम खावटीपोटी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये मुळ अर्ज प्रलंबित असतांना दयावेत म्हणून प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार क्र. १ यांच्या मुख्य अर्जातील कथनानुसार त्यांचा सामनेवाला यांचेशी शेलु शेंदूरसनी ता.आर्णी येथे दिनांक २९/०३/२०१३ रोजी विवाह झालेला असून अद्याप पती पत्नीचे नाते कायम आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये शारी येथे नांदावयास गेली असतांना मुलगी अर्जदार क्र. २ प्रियंका व मुलगा अर्जदार क्र. ३ वैभव हे अपत्य विवाह संबंधातून झालेले आहे. सामनेवाला याला दारुचे व्यसन असुन नशापाणी करुन त्याने अर्जदार क्र.१ हीला शारीरिक व मानसिक त्रास दिलेला आहे. जानेवारी २०२० मध्ये सामनेवाला याने त्रास दिल्यामुळे, हुसकावुन लावल्यामुळे व जिवाने मारण्याची धमकी दिल्यामुळे मुलांबाळासह माहेरी राहत आहे. अर्जदार क्र.१ ही विधवा आईच्या उत्पन्नाचे सहाय्याने तसेच भावाचे आधाराने आपले जीवन कसेबसे जगत आहे. त्यांना महिन्याकाठी प्रत्येकी ७,०००/– असा एकुण २१,०००/– खर्च येत आहे. अशा प्रकारे अर्जदार क्र. १ यांचा सामनेवाला यांनी सबळ कारणाशिवाय त्याग केलेला आहे व पालन पोषणाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही व त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. सामनेवाला हा अवैधपणाने दारुचा व्यवसाय करतो व दररोज रु.२,०००/– मिळवितो. तसेच वर्षाकाठी सालगडी म्हणुन रु.७०,०००/– मिळवितो. अर्जदार यांना उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नाही. त्यामुळे स्वतःच्या व अर्जदार क्र. २ व ३ यांच्या उदरनिर्वाहासाठी विधवा आई व भावावर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे अर्जदार यांचे राहणीमान, गरज तसेच सामनेवाला यांचे राहणीमान, आर्थीक क्षमता विचारात घेता प्रस्तुत अर्ज प्रलंबित असतांना अंतरीम खावटी म्हणून अर्जदार क्र. १ ते ३ यांना दरमहा रुपये ३,०००/– सामनेवाला यांनी अर्ज दाखल तारखेपासून दयावेत अशी विनंती अर्जदार यांनी नि.१५ कडील अर्जाद्वारे केली आहे.

३. सामनेवाला यांनी अर्जदार यांच्या अंतरीम खावटीच्या अर्जास म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक १३/०५/२०२४ रोजी ''विना म्हणणे'' चा आदेश पारित करण्यात आला.

४. अर्जदारांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. सामनेवाला तर्फे वकीलांनी युक्तिवाद केला नाही. त्यामुळे सामनेवाला तर्फे ''युक्तिवाद नाही'' चा आदेश नि.१ वर दिनांक ०८/१०/२०२४ रोजी पारित करण्यात आला. अर्जावरुन खालील मुद्दयांकरिता कारणमिमासेंसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार मागणीप्रमाणे अंतरिम खावटी मिळण्यास पात्र आहेत काय ? | ... अंशतः होय. |
| २ | आदेश काय | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>वादप्रश्न क्रमांक १ करिता</u>:–**

५. सामनेवालाने अर्जदारांचा मानसिक छळ केला असून ते स्वतःची उपजिवीका करण्यास असमर्थ असल्याने अर्ज मंजूर करण्याचा युक्तीवाद अर्जदारांचे वकीलांनी केला.

६. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ नुसार अंतरिम आदेशाकरीता केलेल्या अर्जाचा निकाल देतांना प्रकरणात खोलवर जाणे आवश्यक नसते. केवळ प्रथमदर्शनी तथ्ये दिसून येणे आवश्यक असते. अर्जदारांनी अर्जात केलेल्या कथनांना तसेच सामनेवालाने त्याचे उत्तरात केलेल्या कथनांना दुजोरा देण्यासाठी पुरावा दाखल करणे आवश्यक नसते.

७. प्रस्तूत प्रकरणात सामनेवाला याने अर्जदार हिचेशी झालेला विवाह तसेच त्यातून त्यांना दोन अपत्य झाल्याचे नाकारलेले नाही. तसेच अर्जदार ही माहेरी राहत असल्याचे देखील अभिलेखावर आले आहे. त्यामुळे केवळ अर्जदार हे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे किंवा नाही तसेच सामनेवाला याचेकडे अर्जदारांचे पालन पोषण करण्यासाठी उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे किंवा नाही हेच पाहणे गरजेचे आहे. कोणत्याही स्त्रीचे लग्न झाल्यानंतर तिच्या निर्वाह भत्त्याची जबाबदारी तिच्या पतीवर असते. लग्नानंतर लगेचच पत्नीला निर्वाह भत्त्याचा अधिकार प्राप्त होतो. पत्नीचे पालनपोषण करणे, ही पतीची नैतीक जबाबदारी असते. तसेच मुले स्वतःच्या

पायावर उभे राहीपर्यंत त्यांचा पालनपोषणाचा तसेच शिक्षणाचा खर्च करण्याची जबाबदारी ही कमावत्या पित्यावर असते.

८. अर्जदार हे स्वतःचा उदर निर्वाह करण्यासाठी असक्षम असल्याचे दिसून येते. म्हणून अर्जदार हे सामनेवाला याचेकडून अंतरिम पोटगीची रक्कम मिळण्यास पात्र असल्याचे निष्पन्न होते. सामनेवाला हा सालगडी म्हणुन काम करित असुन त्यापासुन त्याला वर्षाकाठी ७०,०००/– रुपये मिळत असल्याचे अर्जदाराचे म्हणणे असले तरी त्याबाबत कगदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदारांची दरमहा रक्कम रुपये ७,०००/– प्रत्येकी इतकी अंतरिम पोटगी मिळण्याची मागणी अवास्तव वाटत आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती पाहता अर्जदार क्र.१ हिस रुपये २,०००/– तर अर्जदार क्र.२ व ३ यांना रुपये ५००/– दरमहा अंतरिम पोटगी देणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादप्रश्न १ चे उत्तर मी त्याप्रमाणे नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्रमांक २ करिता:–**

९. स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असक्षम असलेल्या व्यक्तिंच्या राज्यघटनेने दिलेल्या हक्कांचे परिणामकारक संरक्षण करण्याचा, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ ते १२८ या तरतुदींचा प्रमुख उद्देष आहे. त्यामुळे सदर कायदयाचा उद्देश जोपासण्याच्या दृष्टीने आणि वादप्रश्न १ च्या निष्कर्षांन्वये अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र ठरतो. सबब वादप्रश्न क्रमांक २ चा निष्कर्ष नोंदवितांना मी खालील आदेश पारित करण्यात येत आहे–

**आदेश**

| | |
|---|---|
| **१.** | अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| **२.** | प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यापासून म्हणजेच दिनांक १५/०४/२०२४ पासून अंतरिम पोटगी पोटी सामनेवाला याने अर्जदार क्र.१ हिस दरमहा रक्कम रुपये २,०००/– (रुपये दोन हजार मात्र) तर अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये ५००/– (रुपये पाचशे मात्र) द्यावेत. |
| **३.** | अर्जदार व सामनेवाला यांना निकालाची प्रत मोफत देणेत यावी. |

(खुल्या न्यायालयात घोषित)

DHONDAGE VISHAL SHRAVAN
Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2024.10.25 12:42:15 +0530

दिनांक १५/१०/२०२४ (विशाल श्रावण धोंडगे)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आर्णी.